नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०४/२०२६ (शनिवार)

# नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अपघात व मृत्यू दरात लक्षणीय घट
## गेल्या ४ वर्षातील सर्वात कमी मृत्यूंची नोंद

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा—आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

सदर कालावधीत प्राणांतिक रस्ते अपघातांमध्ये २४ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २७ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत १० टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने तिसरे स्थान प्राप्त केले आहे.

**MAHARASHTRA STATE**

Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO MAR 2025* | | | JAN TO MAR 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO MAR 2025*- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Gadchiroli | 54 | 38 | 31 | 72 | 27 | 88 | 33 | -29 | 184 |
| 2 | MB-VV | 182 | 38 | 168 | 230 | 44 | 210 | 26 | 16 | 25 |
| 3 | Ratnagiri | 85 | 29 | 85 | 100 | 32 | 105 | 18 | 10 | 24 |
| 4 | Latur | 194 | 93 | 128 | 223 | 113 | 121 | 15 | 22 | -5 |
| 5 | Dhule | 159 | 94 | 151 | 181 | 94 | 185 | 14 | 0 | 23 |
| 6 | Raigad | 154 | 66 | 171 | 175 | 64 | 221 | 14 | -3 | 29 |
| 7 | Gondia | 92 | 52 | 47 | 104 | 60 | 72 | 13 | 15 | 53 |
| 8 | **Pune R** | 482 | 261 | 373 | 532 | 250 | 339 | 10 | -4 | -9 |
| 9 | Navi Mumbai | 206 | 85 | 180 | 227 | 69 | 215 | 10 | -19 | 19 |
| 10 | Nasik City | 140 | 57 | 128 | 153 | 41 | 148 | 9 | -28 | 16 |
| 11 | C.S.Nagar R | 219 | 146 | 105 | 239 | 128 | 191 | 9 | -12 | 82 |
| 12 | Jalna | 169 | 94 | 153 | 180 | 95 | 150 | 7 | 1 | -2 |
| 13 | **Solapur R** | 302 | 167 | 331 | 318 | 190 | 338 | 5 | 14 | 2 |
| 14 | Amravati City | 100 | 18 | 93 | 105 | 28 | 100 | 5 | 56 | 8 |
| 15 | **PCPC** | 323 | 84 | 288 | 338 | 90 | 352 | 5 | 7 | 22 |
| 16 | Thane R | 108 | 58 | 100 | 113 | 61 | 108 | 5 | 5 | 8 |
| 17 | Amravati R | 133 | 83 | 109 | 139 | 92 | 108 | 5 | 11 | -1 |
| 18 | **Pune City** | 339 | 85 | 265 | 354 | 82 | 280 | 4 | -4 | 6 |
| 19 | Beed | 187 | 121 | 120 | 194 | 81 | 125 | 4 | -33 | 4 |
| 20 | **Thane City** | 296 | 66 | 300 | 304 | 64 | 297 | 3 | -3 | -1 |
| 21 | **Nasik R** | 377 | 216 | 198 | 382 | 225 | 435 | 1 | 4 | 120 |
| 22 | Hingoli | 115 | 68 | 93 | 116 | 63 | 90 | 1 | -7 | -3 |
| 23 | Akola | 125 | 59 | 88 | 126 | 47 | 104 | 1 | -20 | 18 |
| 24 | **Ahilyanagar** | 488 | 231 | 396 | 489 | 213 | 360 | 0 | -8 | -9 |
| 25 | Sangli | 257 | 149 | 208 | 255 | 133 | 189 | -1 | -11 | -9 |
| 26 | **Mumbai City** | 666 | 103 | 677 | 660 | 76 | 700 | -1 | -26 | 3 |
| 27 | Chandrapur | 197 | 93 | 183 | 188 | 79 | 184 | -5 | -15 | 1 |
| 28 | Wardha | 109 | 44 | 134 | 104 | 52 | 89 | -5 | 18 | -34 |
| 29 | C.S.Nagar City | 164 | 40 | 140 | 155 | 52 | 133 | -5 | 30 | -5 |
| 30 | Parbhani | 142 | 75 | 117 | 133 | 67 | 92 | -6 | -11 | -21 |
| 31 | Solapur City | 61 | 22 | 75 | 57 | 21 | 39 | -7 | -5 | -48 |
| 32 | Satara | 264 | 136 | 194 | 244 | 119 | 188 | -8 | -13 | -3 |
| 33 | Jalgaon | 229 | 121 | 178 | 210 | 123 | 154 | -8 | 2 | -13 |
| 34 | Palghar | 146 | 84 | 73 | 133 | 78 | 93 | -9 | -7 | 27 |
| 35 | Buldhana | 186 | 104 | 101 | 168 | 98 | 107 | -10 | -6 | 6 |
| 36 | Bhandara | 111 | 45 | 92 | 96 | 42 | 103 | -14 | -7 | 12 |
| 37 | **Kolhapur** | 296 | 117 | 259 | 255 | 106 | 224 | -14 | -9 | -14 |
| 38 | **Nagpur City** | 331 | 82 | 348 | 284 | 60 | 298 | -14 | -27 | -14 |
| 39 | Nandurbar | 95 | 52 | 119 | 78 | 47 | 137 | -18 | -10 | 15 |
| 40 | Sindhudurg | 50 | 23 | 61 | 41 | 17 | 54 | -18 | -26 | -11 |
| 41 | Yavatmal | 237 | 134 | 180 | 186 | 116 | 110 | -22 | -13 | -39 |
| 42 | Dharashiv | 184 | 108 | 183 | 141 | 90 | 122 | -23 | -17 | -33 |
| 43 | Nagpur R | 274 | 124 | 281 | 209 | 91 | 252 | -24 | -27 | -10 |
| 44 | Nanded | 257 | 145 | 160 | 193 | 102 | 104 | -25 | -30 | -35 |
| 45 | Washim | 100 | 69 | 58 | 75 | 36 | 61 | -25 | -48 | 5 |
| | TOTAL | 9385 | 4179 | 7922 | 9259 | 3858 | 8175 | -1 | -8 | 3 |

Figure 1: Road Crash Data in Maharashtra

**विशेष म्हणजे, सन २०२६ च्या पहिल्या तिमाहीत (Q1) मागील चार वर्षांच्या त्याच कालावधीच्या तुलनेत सर्वात कमी रस्ते अपघात आणि मृत्यूंची नोंद झाली आहे.**





Figure 2: Road Crash Fatality Trend Q1 (Jan-Mar) 2022 to 2026

**अपघातांच्या सविस्तर विश्लेषणातून विशिष्ट धडक प्रकारांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये M2W विरुद्ध M2W अपघातांमध्ये ७२ टक्क्यांनी घट, पादचारी विरुद्ध ट्रक अपघातांमध्ये ६४ टक्कयांनी घट, तसेच M2W विरुद्ध ट्रक अपघातांमध्ये २५ टक्कयांनी घट नोंदविण्यात आली आहे. याशिवाय, ओळखण्यात आलेल्या १८ उच्च–मृत्यू प्रवण रस्त्यावर एकूण २८ टक्क्यांनी घट आढळून आली आहे.**

**Zero Fatality District (ZFD) उपक्रमांतर्गत नागपूर ग्रामीण पोलिसांनी डेटा–आधारित अंमलबजावणी कृती आराखडे तयार करून अतिवेग, धोकादायक वाहन चालविणे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणे यांसारख्या प्रमुख जोखीम घटकांवर लक्ष केंद्रित करत सातत्यपूर्ण व लक्षित विशेष मोहिमा राबविल्या आहेत. या अंमलबजावणीमुळे रस्ते सुरक्षा स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.**

तसेच, सदर उपक्रमांतर्गत महत्त्वाच्या ठिकाणी रस्ते सुरक्षा अभियांत्रिकी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. उच्च मृत्यू प्रवण मार्गांवरील

उच्च—जोखीम ठिकाणांची ओळख करून त्या ठिकाणी अभियांत्रिकी सुधारणा करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, त्यामुळे अशा ठिकाणी मृत्यूंच्या संख्येत घट झाली आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीस रस्ते सुरक्षेस अधिक बळकटी देण्यासाठी कटिबद्ध असून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित रस्ते सुनिश्चित करण्यास सहकार्य करावे.**

## आंतरराज्यीय टोळी निष्पन्न, मालमत्तेविरूध्द चे २६ गुन्हे उघड, सोन्याचा ऐवज, शेतमाल, दुचाकी, चारचाकी आणि इतर वस्तुंसह २६ लाख २ हजार ४७६ रूपयांचा २६ गुन्हयातील संपुर्ण मुद्देमाल जप्त ३ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

नगापुर ग्रमीण जिल्हयातील उघड न झालेलया गुन्हयांचा तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय बातमीदारामार्फत माहीती प्रात्प झाली की, पांढुर्णा, मध्यप्रदेश येथील आरोपींनी नागपुर ग्रामीण जिल्हयात बऱ्याच ठिकाणी चोरी आणि मालमत्तेविरूध्द इतर गुन्हे केले आहे. सदर आरोपींना शोधण्यासाठी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे विविध पथके तयार करण्यात आले. दिनांक १०/०४/२०२६ स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना नमुद आरोपींबाबत गोपनिय बातमीदाराने खात्रीशिर महीती दिल्याने पोलीसांनी त्यांना पकडण्यासाठी सापळा रचुन कारवाई केली. नमुद कारवाईत पोलीसांनी १) करणसिंग जगसिंग भादा, वय २५ वर्षे, २) संगमसिंग जगदीशसिंग बावारी, वय ४९ वर्षे, दोन्ही रा शात्री वॉर्ड कबडी मोहल्ला पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश आणि ३) नितेश रमेश गायकवाड, वय २९ वर्षे, रा बामणी बस स्टॉप जवळ, पांढुर्णा, मध्य प्रदेश यांना पांढुर्णा येथुन शिताफिने ताब्यात घेतले. नमुद आरोपींकडे कौशल्यापुर्ण आणि सखोल चौकशी केली असता त्यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयात घरफोडी, शेतातील माल चोरी, वाहन चोरीचे तसेच मध्यप्रदेश राज्यात वाहन चोरी असे एकुण २६ गुन्हे केल्याची कबुली दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष विविधी गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमाल १) सोन्याचा ऐवज किंमती ९,३८,०००/— रूपये, २) शेतमाल किंमती १२,९०,४७६/—रूपये, ३) दोन दुचाकी वाहने किंमती —१,४०,०००/—रूपये, ४) महिंद्रा पीक चार चाकी वाहन किंमती २,००,०००/—रूपये आणि ५) चोरी गलेले टिव्ही, फ्रिज, खुर्च्या इत्यादी साहीत्या किंमती — ३४,०००/—रूपये, असा एकूण २६,०२,४७६/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वर नमुद ३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

**घरफोडी**

१) पोस्टे केळवद अप.क्रमांक २५२/२५ कलम ३३१(३),३०५,(अं) भान्यासं
२)पोस्टे केळवाद अप.क्रमांक २६७/२५ कलम ३३१(३),३०५,(अं) भान्यासं
३) पोस्टे खापा अप.क्रमांक ३४२/२५ कलम ३३१(३),३०५,(अं) भान्यासं
४) पोस्टे खापा अप.क्रमांक ३४३/२५ कलम ३३१(३),३०५,(अं) भान्यासं
५) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक २८८/२६ कलम ३०५(अ),३३१(४) भान्यासं
६) पोस्टे काटोल अप.क्रमांक ३८६ /२६ कलम ३०५(अ ), ३३१(४) भान्यासं
७) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक २६/२६ कलम ३०५(अ ), ३३१(४) भान्यास
८) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक २५९/२६ कलम ३०५(अ ), ३३१(४) भान्यासं
९)पोस्टे केळवाद अप.क्रमांक १२६ /२६ कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भान्यासं

**शेतातील शेतमाल चोरी**

१०) पोस्टे सावनेर अप.क्रमांक २६ / २६ कलम ३०३(२) भान्यासं
११) पोस्टे सावनेर अप.क्रमांक ३० / २६ कलम ३०३(२) भान्यासं
१२) पोस्टे खापा अप.क्रमांक ०३ / २६ कलम ३०३(२) भान्यासं
१३) पोस्टे केळवाद अप.क्रमांक १२३ / २६ कलम ३०३(२) भान्यासं
१४) पोस्टे सावनेर अप.क्रमांक २६२/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
१५) पोस्टे नरखेड अप.क्रमांक २३९ / २६ कलम ३०३(२) भान्यासं
१६) पोस्टे नरखेड अप.क्रमांक २४०/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
१७) पोस्टे पारशिवानी अप.क्रमांक ५४ / २६ कलम ३०३(२) भान्यासं
१८) पोस्टे पारशिवानी अप.क्रमांक ११७/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
१९) पोस्टे पारशिवानी अप.क्रमांक १२५/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
२०) पोस्टे रामटेक अप.क्रमांक २१९/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
२१) पोस्टे पारशिवानी अप.क्रमांक ५९८/ २५ कलम ३०३(२) भान्यासं

२२) पोस्टे पारशिवानी अप.क्रमांक ६१०/ २५ कलम ३०३(२) भान्यासं
२३) पोस्टे कन्हान अप.क्रमांक ८९१/ २५ कलम ३०३(२) भान्यासं

**दुचाकी आणि चारचाकी वाहन चोरी**

२४) पोस्टे कळमेश्वर अप.क्रमांक २०९/ २६ कलम ३०३(२) भान्यासं
२५) पोस्टे खापा अप.क्रमांक ६९१/ २५ कलम ३०३(२) भान्यासं
२६) पोस्टे मुलताई राज्य म. प्र. अप.क्रमांक २०२ कलम ३०३(२) भान्यासं

**असे एकुण २६ गुन्हे उघड झाले आहे.**



## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक, केळवद पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक ०९/०४/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, कारने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील खुर्सापार चेकपोस्ट येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान टाटा इंडीका कार क्र. एम एच ३२ सी ९७१३ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची तपासणी केली असता

प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **आरोपी नामे संतोष हजारीलाल चांडक, वय ५३ वर्ष, रा. वृंदावन नगर, प्लॉट नं १७ वर्धा याला ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता सदर तंबाखु विक्री करण्यासाठी अवैधरित्या कार मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु ठेवला असल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष सुगंधित तंबाखुचा एकुण २४.४० किलो प्रतिबंधित साठा किंमती ४७,६००/— रूपये टाटा इंडीका कार क्र. एम एच ३२ सी ९७१३ किंमती १,२५,०००/—रूपये आणि एक मोबाईल असा एकुण १,८२,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## पोलीस भवन ,पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण जिल्हा येथे अंमली पदार्थ ओळख व सुरक्षित हाताळणीसंदर्भात कार्यशाळा

नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थ विक्री, तस्करी, तसेच अंमली पदार्थ सेवन करण्याऱ्यांवर सतत कारवाई केली जात आहे.त्या अनुषंगाने मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ११/०४/२०२६ रोजी पोलीस भवन, पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण येथे अंमली पदार्थ कसे ओळखावे व त्यांना हाताळतांना काय काळजी घ्यावी या विषयावर स्थानिक गुन्हे शाखा, अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक, नागपुर ग्रामीण तसेच पोलीस स्टेशनचे चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार

यांच्यासाठी कार्यशाळ आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, नागपूर चे प्राध्यापक डॉ. भारत भानवसे, यांनी कार्यशाळेस उपस्थित पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना अंमली पदार्थ कसे ओळखावे व त्यांना हाताळतांना काय काळजी घ्यावी या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.





## अवैधरित्या विनापरवाना दगड वाहतुकीच्या बातमीबाबत..

पोलीस स्टेशन पाचगाव :— **दिनांक ०८/०४/२०२६ रोजच्या एका वृत्तपत्रात क्रशर खाणीतुन विना रॉयल्टी रवाडी वाहतुक अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. दोन पकडलेले ट्रक ठाण्यात जमा पोलीसांनी खाणमालकावर गुन्हा नोंदविलाच नाही असे नमुद केले आहे.** सदर प्रकरणाची सविस्तर माहीती अशी आहे की, दिनांक ०५/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीस मौजा सालई मेंढा टावरी खदान परिसरात पेट्रोलींग करित असता **ट्रक क्रमांक एम एच—४०/सी टी—६७१२ आणि ट्रक क्र. एम एच—३५/ए जे—२०३३** हे वाहन मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात दगड भरून असल्याचे आढळुन आले. दोन्ही वाहन चालकांना दगड वाहतुक तसेच वाहनाचे परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणताही परवाने सादर केले नाही. दोन्ही वाहनांना ताब्यात घेवुन वाहनावर कार्यवाही बाबत तहसीलदार उमरेड यांना पत्रव्यवहार करण्यात आला. मंडळ अधिकारी यांनी

सदर वाहनाचे पंचनामे तयार केले असुन तहसीलदार उमरेड यांनी दंडात्मक कार्यवाही साठी उपविभागिय दंडाधिकारी,उमरेड विभाग यांच्या कडे सादर केले आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ११/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १६ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १३ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३५ आरोपी अशा एकुण १९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने